# Visual MELODY

THE RAVI PARANJAPE STUDIO

5th Year of Visual Melody E-Magazine

E-Magazine About Visual Arts In free india
By - The Ravi Paranjape Studio

Volume 19 - Quarterly Issue - 1st September 2024




COVER STORY
Illustrator
**Padma Sahasrabuddhe**

All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged.

***"Absorb the beauty and present it beautifully"***

*Ravi Paranjape*

# Visual
# MELODY

Visual Melody is a content-rich Free quarterly E- Magazine offered by The Ravi Paranjape Studio, dedicated to great Indian artists of the past and present generations.

*This FREE e-magazine is published quarterly in Marathi and English.*

*Visual Melody **FREE** subscription link:*
*https://www.raviparanjape.org/emagazine*

***The Ravi Paranjape Studio***
*'The Ravi Paranjape Studio' is a privately operated group. The group's objective is to promote the 'Design Based Culture' envisioned by Artist Ravi Paranjape, through several initiatives run at the studio's art gallery and exhibition space located in Model Colony, Pune.*

***Credits***
*Editor: Rahul Deshpande*
*Art Direction: Sunil Gokarn*
*Design : Vinayak Chhatre*
*Project Coordinator: Varsha Pendse*

*1 Rutika, 1098/5-A, Model Colony,*
*Shivaji Nagar, Pune - 411016*

*+91 942 356 2530*
*www.raviparanjape.org*
*abhijatkala@gmail.com*

*All published information and images in this e-magazine are duly acknowledged and copyright protected by the respective parties.*
*This e-magazine is free to share as is. No part of this e-magazine shall be reproduced or shared in parts or used in any other way than intended.*

5th Year of Visual Melody E-Magazine

## THE 5TH YEAR OF VISUAL MELODY!

Celebrating the 5th year of 'Visual Melody,' the FREE quarterly e-magazine offered by 'The Ravi Paranjape Studio'. 'Visual Melody' introduces you to brilliant Indian artists from various facets of visual art from the past and present generations. We are pleased to present the first issue of the fifth year of Visual Melody, featuring artist-cartoonist-caricaturist 'Mario Miranda'. This issue is published today on March 1, 2024 at raviparanjape.org/emagazine.

The inaugural issue of 'Visual Melody,' dedicated to the legendary painter Madhavrao Satavlekar, was launched on October 8th, 2019 under the auspices of Shri. Ravi Paranjape, commemorating his 84th birthday. Since 2020, the e-magazine featured one phenomenal artist each quarter– Shri K.B. Kulkarni, Shri N.S. Bendre, Shri Dinanath Dalal, Shri Gopalrao Deuskar, Shri Ravindra Mestry, Shri S.M. Pandit, Shri Ravi Paranjape, Shri S.D. Phadnis, Shri G.S. Majgaonkar, Shri Shivaji Tupe, Shri Datta Padekar, Shri Maruti Patil, Shri Madan Garge, Shri Charuhas Pandit, Shri Chintamani Hasabnis, and Shri Arvind Mestry. All of these issues are available at raviparanjape.org/emagazine for your enjoyment.

The creative team behind Visual Melody looks forward to continue bringing artistic brilliance to you through this publication. The exquisitely designed Visual Melody is published in English and Marathi in the same issue.

## 'व्हिजुअल मेलडी' ई-अंकाचं पाचव्या वर्षात यशस्वी पदार्पण.

द रवी परांजपे स्टुडियो तर्फे प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या 'व्हिजुअल मेलडी' या विनामूल्य ई-अंकाचं हे पाचवं वर्ष सुरु होत आहे. दृष्य कलेच्या विविध शाखांमधल्या, कालच्या आणि आजच्या पिढीतल्या अग्रणी कलाकारांची ओळख 'व्हिजुअल मेलडी' या अंकातून करून दिली जाते. 'व्हिजुअल मेलडी' च्या पाचव्या वर्षाचा शुभारंभ आज १ मार्च २०२४ ला प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या अंकातून सुप्रसिद्ध चित्रकार-व्यंगचित्रकार श्री. मारियो मिरांडा यांच्या कलेला दिलेल्या आदरांजलीने करत आहोत.

ज्येष्ठ चित्रकार श्री. माधवराव सातवळेकर यांना मानवंदना देणारा 'व्हिजुअल मेलडी' चा पहिला अंक ८ ऑक्टोबर २०१९ साली श्री. रवी परांजपे सरांच्या ८४ व्या वाढदिवसाचं औचित्य साधत प्रसिद्ध झाला. त्यानंतर २०२० सालापासून प्रत्येक तिमाहीला एकेका दिग्गज कलाकाराची ओळख करून देणारे 'व्हिजुअल मेलडी' चे अंक प्रसिद्ध केले गेले, त्यात या अत्यंत गुणी कलाकारांचा समावेश आहे – श्री. के. बी. कुलकर्णी, श्री. एन. एस. बेंद्रे, श्री. दिनानाथ दलाल, श्री. गोपाळराव देऊस्कर, श्री. रवींद्र मेस्त्री, श्री. एस. एम. पंडित, श्री. रवी परांजपे, श्री. शि. द. फडणीस, श्री. जी. एस. माजगावकर, श्री. शिवाजी तुपे, श्री. दत्ता पाडेकर, श्री. मारुती पाटील, श्री. मदन गर्गे, श्री. चारुहास पंडित, श्री. चिंतामणी हसबनीस, आणि श्री. अरविंद मेस्त्री. हे सर्व अंक raviparanjape.org/emagazine या ठिकाणी सर्व कालारसिकांसाठी उपलब्ध आहेत.

'व्हिजुअल मेलडी' चं संपादक मंडळ अशाच गुणी कलाकारांची ओळख तुमच्या पर्यंत पोचवायला कायम प्रयत्नशील राहील. 'व्हिजुअल मेलडी' चा अत्यंत सुबक आणि देखणा ई-अंक दर तीन महिन्याला इंग्लिश आणि मराठी अशा दोन भाषांत प्रसिद्ध होतो.




चित्रकर्ती

# पद्मा सहस्रबुद्धे

स्वातंत्र्योत्तर भारतीय बोधचित्रकलेतील एक महत्त्वाच्या स्त्री-चित्रकार पद्मा सहस्रबुद्धे यांच्या कलाकारकिर्दीचा मागोवा या अंकात घेतला आहे. त्यांचे कलाशिक्षण, चित्रनिर्मितीची वैशिष्ट्ये आणि कलायोगदानाचा घेतलेला हा आढावा आम्ही व्हिज्युअल मेलेडीच्या या अंकात सादर करीत आहोत.

~ चित्रकार राहुल देशपांडे


वाङ्मयशोभा
दीपावलि विशेषांक १९६९
किंमत


चंद्रकांत
राजाची
कन्या


डोह
श्रीनिवास
विनायक
कुलकर्णी

**चित्रकर्ती पद्मा सहस्त्रबुद्धे**


भारतीय चित्रकला क्षेत्रामध्ये स्त्री-चित्रकारांचे स्थान फारसे अधोरेखित झालेले आढळत नाही. अमृता शेरगील, अंबिका धुरंधर, अँजेला त्रिंदाद, बी. प्रभा अशी काही मोजकी नावे सोडल्यास इतर अनेक गुणी चित्रकर्तींबाबत फारशी माहिती आपल्याला आढळत नाही. पेंटिंगचे क्षेत्र असो वा उपयोजित कलेचे क्षेत्र, कलाक्षेत्रातील योगदानाची दखल स्त्री-चित्रकारांच्या बाबतीत थोडी दुर्लक्षित आहे, हे मात्र खरेच.

हे असे का घडले असावे, याबाबत विचार करताना काही गोष्टी प्रामुख्याने समोर आल्या. त्यामध्ये महत्त्वाची गोष्ट म्हणजे विवाहानंतर अनेक स्त्री-चित्रकारांची प्रापंचिक जबाबदारीला प्राधान्य दिल्यामुळे चित्रनिर्मिती खंडित होते अथवा मागे पडते व हळूहळू त्या चित्रकलेच्या मुख्य प्रवाहापासून दूर जातात. परिणामतः स्त्री-चित्रकर्त्यांच्या कलाकर्तृत्वाला मर्यादा पडतात. मात्र काही स्त्री-चित्रकारांना घरून पाठिंबा व विवाहानंतर जोडीदाराची साथ मिळते. अनेक अडचणींवर मात करून स्त्री-चित्रकार कार्यरत राहतात. अर्थात हे खूप अवघड आणि आव्हानात्मक असते. म्हणूनच कलाक्षेत्रात स्त्री-चित्रकारांचे योगदान हे महत्त्वाचे ठरते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील उपयोजित कलाक्षेत्रातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे चित्रकर्ती पद्मा सहस्त्रबुद्धे. अनेक आव्हानांना सामोरे जात आणि गुणात्मक दर्जा राखत त्यांनी सातत्याने चित्रनिर्मिती केली. बोधचित्रकारितेच्या क्षेत्रातील पुस्तकप्रकाशन व मासिकांसाठी चित्रनिर्मिती अशा मर्यादित क्षेत्रात त्यांनी आपल्या कामाचा एक वेगळा ठसा निर्माण केला.







गीत रामायण
ग. दि. माडगूळकर


आशा बगे
मारवा


किशोर
ऑक्टोबर ७२
७५ पैसे


किशोर
सप्टेंबर १९७४




पुण्यात 1934 साली जन्मलेल्या पद्माताईंना घरातूनच सुसंस्कृत वातावरण मिळाले. 1949 साली मुंबईमधून त्या एस.एस.सी.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. शालेय जीवनापासूनच चित्रकलेची गोडी असलेल्या पद्माताईंना चित्रकलेचे उच्च शिक्षण घेण्याची ओढ होती. घरामधून यासाठी विरोध नव्हता, परंतु व्ही. टी. जवळील 'सर जेजे स्कूल ऑफ आर्ट्स'ला दादरपासून एकटीने प्रवास करून जाण्याची संमती त्यांना घरून मिळाली नाही. कला शिक्षणाची संधी आयुष्यातून निसटून जात आहे की काय असे वाटत असतानाच त्यांना दादरमधील 'मॉडेल आर्ट इन्स्टिट्यूट' बद्दल समजले. येथेच त्यांनी आपल्या उच्च कलाशिक्षणाची सुरुवात केली. 1950 साली सुरू झालेल्या शिक्षणात त्यांना प्रसिद्ध जलरंग चित्रकार एम. एस. जोशी यांच्याबरोबरच नाना ठोसर, आर. पी. जोशी अशांचे मार्गदर्शन लाभले. मॉडेल आर्ट इन्स्टिट्यूटमधून त्यांनी चित्रकलेची पदविका पूर्ण केली. याच दरम्यान वडील श्री. विनायक गोरे यांचे मित्र श्री. राम पटवर्धन यांच्या ओळखीने 'मौज प्रकाशना'च्या सत्यकथा मासिकासाठी त्यांनी बोधचित्रांची कामे केली. त्यांच्याच प्रोत्साहनाने 1953 पासून कथाचित्रांद्वारे त्यांनी आपली बोधचित्रकारितेतील कारकीर्द सुरू केली. 1954 साली त्यांचा विवाह मुंबईतील श्री. मुकुंद सहस्रबुद्धे यांच्याशी झाला. कलाक्षेत्रात काम करण्यासाठी त्यांना लग्नानंतरही घरून पाठिंबा मिळाला.

बोधचित्रांची कामे करताना त्यांची छपाई तंत्राची जाण विकसित झाली. ज्यामधून प्रयोग करत त्यांनी स्वतःची शैली विकसित केली. पद्माताईंच्या एकूण कामाचा आढावा घेतल्यावर असे लक्षात येते की, त्यांनी तीन प्रकारात काम केले आहे. पहिला प्रकार रेखांकनप्रधान चित्रे ज्यामध्ये मुक्त रेषांची पुनरावृत्ती करत आकारांची जडणघडण सूचित केली आहे. दुसऱ्या प्रकारात छपाई तंत्राच्या मर्यादितून चित्रनिर्मिती केलेली आहे. ज्यामध्ये सुलभ आकार व सपाट रंगलेपन या बरोबरीनेच पोत(टेक्स्चर)चा वापर केलेला आढळतो. तिसऱ्या प्रकारात जलरंगातील वेट-इन-वेट तंत्राचा वापर करीत चित्रामध्ये स्वप्नील व धुसर वातावरणनिर्मिती केली आहे. मर्यादित रंगाचा वापर करताना छटांच्या साहाय्याने योग्य परिणाम साधलेला दिसतो. काही चित्रांमध्ये रेखाटन आणि जलरंग यांचा एकत्रित वापर केलेला आढळतो. जलरंगातील त्यांच्या चित्रांवर एम. एस. जोशी यांच्या चित्रांचा प्रभाव जाणवतो. मासिकातील चित्रे, पुस्तकांची मुखपृष्ठे, लहान मुलांसाठीच्या कथा व कविता यासाठी त्यांनी प्रामुख्याने काम केले आहे. त्या काळातील अनेक श्रेष्ठ लेखक, कवी, संपादक यांच्या सानिध्यात त्यांच्या साहित्यविषयक जाणीवा समृद्ध होत गेल्या. यातूनच साहित्यकृतीचा आशय एका चित्रातून व्यक्त करण्यासाठी त्यांनी स्वप्रयत्नातून वेगवेगळ्या चित्रभाषा शोधल्या व त्यांचे उपयोजन, साहित्यप्रकार आणि लेखनशैली परिणामकारकतेने लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी वापरल्या.

बालसाहित्यासाठी त्यांनी आपले कलायोगदान दिलेले आहे. 'किशोर' या मासिकाच्या सुरुवातीपासून (1971) मुखपृष्ठ, कविता, कथा, नाटुकली यांच्यासाठी त्यांनी विविध प्रकारात बोधचित्रनिर्मिती केली. यात विषयांची विविधता, रंगीत छपाई यांचा उपयोग करून चित्रनिर्मितीचे अनेक प्रयोग केले. लहान मुलांना भावेल असा रंगांचा वापर आणि त्यांच्या भावविश्वाशी निगडित दृश्य प्रतिमा त्यांनी आपल्या चित्रशैलीमधून व्यक्त केल्या.

त्यांचे सर्व काम जरी उपयोजित स्वरूपाचे असले, तरीही प्रयोजनापलीकडे एक सुंदर चित्रकृती म्हणून त्यांची अनेक चित्रे रसिकांच्या लक्षात राहिली आहेत. बोधचित्रकारितेच्या विद्यार्थ्यांसाठीसुद्धा ही चित्रे अभ्यासनीय आहेत. स्वतंत्र भारतातील नवनिर्मितीच्या वातावरणात तसेच याच काळात साहित्य-चळवळीतील अनेक विचार-प्रवाह सक्षम होत असताना त्यांनी आपल्या चित्रकृतीतून एक संयत, तरल आणि सौंदर्यपूर्ण असे प्रतिमाविश्व उभे केले. म्हणूनच त्यांची चित्रे ही एका महत्त्वाच्या आणि मोठ्या कालखंडाचे प्रतिबिंबित म्हणून कायमच महत्वाची ठरली आहेत.

~ चित्रकार राहुल देशपांडे










पंधराव्या मजल्यावरती



एक थेंब पावसाचा
ओथंबलेलं


रोजचा राजा






एका सकाळी







Artist

# Padma Sahasrabuddhe

This issue of 'Visual Melody' introduces one of the significant female artists of post-independence India, Padma Sahasrabuddhe, who built an impressive career as an illustrator. It covers Padmatai's early life, education, and highlights the important artistic features of her work.

English interpretation: Varsha Pendse









**Padma Sahasrabuddhe**

The contributions of female artists to Indian art have often been underappreciated or overlooked. Apart from a few celebrated women artists like Amrita Sher-Gil, Ambika Dhurandhar, Angela Trindade, and B. Prabha; the work of many talented Indian female artists in both fine and applied arts has sadly remained obscure.

It has been observed that many women artists prioritize family life over their professional art careers after marriage. This often leads to a gradual drift away from active art production, limiting their creative potential, or in some cases, they stop creating art altogether. Against this backdrop, the contributions of female artists who continued to work despite the challenges, and with the support of their families, stand out significantly.

In post-independence India, one prominent female artist who actively contributed to the field of art was Padma Sahasrabuddhe. Despite facing numerous obstacles, she continued to pursue her artistic dreams, consistently producing high-quality work. Padmatai made her mark in the publishing sector with her impressive illustrations for books and periodicals.

Born in Pune in 1934, Padmatai grew up in a warm and cultured environment. After completing her secondary school certification, she wanted to join the Sir JJ School of Art, driven by the passion for art she had cultivated since childhood. Although her family supported her decision to pursue higher education in the arts, they were hesitant to allow her to travel "all the way" from 'Dadar' to 'V.T.' Just when she thought she might miss the opportunity for formal art education, she discovered the Model Art Institute right in 'Dadar', where she began her art studies in 1950. There, she received guidance from well-known artists like watercolorist M. S. Joshi, artist Nana Thosar, and artist R.P. Joshi. Soon after completing her diploma in art, she got an opportunity of illustrating for a magazine called 'Satyakatha' by Mauj Publications, through her father, Shri Vinayak Gore's friend, Shri Ram Patwardhan. With his encouragement, she set foot on a career path illustrating for stories. Padmatai continued working in the field with the support of her husband Shri. Mukund Sahasrabuddhe whom she married in 1954.

The keen knowledge of printing techniques she acquired while working on illustrating assignments helped Padmatai develop her unique style. Her works can be categorized into three distinct types- First, the line drawings which are characterized by repetitive, flowing lines that suggest forms and shapes. The second type is created with an awareness of printing limitations, featuring simple shapes, flat colors, and textures. The third type creates a mystical atmosphere through the use of the 'wet-in-wet' watercolor technique, often achieving the desired effect with shades even when using a limited color palette. Padmatai also experimented with combining line drawings and watercolors. Watercolorist M.S. Joshi's influence is observed in Padmatai's watercolor works. She extensively worked on book covers, illustrations for stories, and poems for children's literature and magazines. Her associations with notable writers and poets enhanced her artistic and literary sensitivity, enabling her to develop a unique visual language that effectively conveyed the essence of the narrative to readers.











Padmatai significantly contributed to the children's magazine called 'Kishor', since its inception in 1971, illustrating for covers, stories, poems, and short plays. She experimented with themes, colors, and imagery, suitable to the imaginative world of children. Padmatai's illustrations stand as beautiful works of art in their own right, which are also valuable specimens to study for the students of art.

Even during the tumultuous times of post-independence reform and shifts in art and literature in India, Padmatai continued to create a composed and aesthetically pleasing visual world of her own, representing a significant slice of this era.

English interpretation, Varsha Pendse

# *Glimpses of past and future activities of 'The Ravi Paranjape Studio.'*

*It's a pleasure to present the second issue of the year 2024, the fifth year of Visual Melody. In this issue of Visual Melody, we are featuring an intriguing story of Austrian painter Walter Langhammer who came to India under stressful conditions but thrived on the Indian soil.*

***Quarter At-A-Glance at The Ravi Paranjape Studio:***

- *The highlight of the third quarter is our most popular annual Eco-Friendly Ganesh Murti workshop at the studio, conducted by Artist Vinayak Chhatre! Glimpses of the workshop are available on the studio's FB page.*
- *The 'Sunday Sketch Club' is expanding beyond the physical boundaries of the studio, with several people joining the club's WhatsApp group and sharing their work. All individuals interested in sketching and drawing are welcome to join the 'Sunday Sketch Club,' regardless of their skill level.*
- *The new activity of the 'Library Time' exclusive to the SSC members is gaining popularity! The Club patrons get exclusive access to a curated collection of books every first Sunday of the month. Join the Sunday Sketch Club, details at www.raviparanjape.org*
- *Paranjape Sir's books are now available in eBook format on Amazon, making them accessible to readers worldwide!*
- *LIMITED stock of Paranjape Sir's printed books can be ordered directly from the website www.raviparanjape.org*

*We have exciting events coming up throughout the year.*

*Follow www.facebook.com/theraviparanjapestudio and instagram @theraviparanjapestudio for the latest announcements.*

*Visit here for the books authored by Ravi Paranjape-*
*https://raviparanjape.org/product-category/printed-books/*
*https://raviparanjape.org/ebooks/*

*Representative,*
*Ravi Paranjape Foundation*
*www.raviparanjape.org*




# The Sunday Sketch Club

An initiative by **The Ravi Paranjape Studio**

## On Every Sunday 9 am - 11 am

## Open for all

THE RAVI PARANJAPE STUDIO

**The Ravi Paranjpe Studio**

4, Rutika apts., 1098/5A, Model colony, Pune - 41016

Contact: +91 87 66 907 242 / +91 90 96 431 161

Explore **Ravi Paranjape's** books in **Kindle eBook** format!!
**Download today.**

- Read on your smartphone, tablet or computer
- Great for reference

All books available at
https://www.amazon.in



THE RAVI PARANJAPE STUDIO

# art & gallery exhibition space

600 sq ft indoor art gallery

1000 sq ft of beautifully designed outdoor exhibition space

Ideal for individual or group art shows, workshops, art demos..

Indoor and outdoor spaces are available separately or together

**find your expression!**

Inquire:


11 am to 7 pm
+91 9423562530

abhijatkala@gmail.com
raviparanjape.org

The Ravi Paranjape Studio
1 Rutika Apartments
1098/5-A Model Colony
Shivajinagar, Pune 411016

**Plan a visit to see the gallery and exhibition space**

Call/WhatsApp +91 9423562530
abhijatkala@gmail.com



Compliments from

**The Ravi Paranjape Studio, Pune**

For latest events please visit :

www.facebook.com/theraviparanjapestudio

Email: abhijatkala@gmail.com